वर्ष : ०६ | अंक: ०८ | मुंबई, मंगळवार १४ जानेवारी २०२० ते सोमवार २० जानेवारी २०२० | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 वाडिया रुग्णालय बंद होण्याच्या मार्गावर

3 → अर्थव्यवस्थेची घसरगुंडी !

पोलीस कर्मचाऱ्यांसाठी आजारी रजा ← 4

# मला दुचाकीची सवय नाही, पण तीनचाकी सरकार चालवतो आहे



**मला दुचाकी चालवण्याची सवय नाही, पण सध्या तीनचाकी कार नाही पण सरकार चालवतो आहे असं वक्तव्य मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केलं आहे. विरोधकाकंडून महाविकास आघाडी सरकारवर टीका करताना हे तीनचाकी सरकार असल्याचा वारंवार उल्लेख केला जातो. शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादीने एकत्रित सरकार स्थापन केल्याने ही टीका वारंवार केली जात असून, त्यामुळे हे सरकार टिकणार नाही असा वारंवार दावा विरोधक करताना दिसतात. उद्धव ठाकरे यांनी विरोधकांच्या या टिकेला उत्तर दिलं आहे. ३१ व्या राज्यस्तरीय रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रमात ते बोलत होते.**

यावेळी बोलताना उद्धव ठाकरेंनी म्हटलं की, 'आमच्यावर तीनचाकी सरकार असल्याची टीका होत आहे. तीनचाकी तर तीनचाकीष्ठ पण आमचं सरकार चालत आहे ना हे महत्त्वाचं आहे. समतोल जमला पाहिजे मग दोन चाकं असो किंवा तीन चाकं असो'. चार चाकं असूनही आपटायचे ते आपटले आहेत असा टोलाही यावेळी त्यांनी लगावला. 'जो चालवणारा असतो त्याच्या हातातील चाक महत्त्वाचं असतं. ते खरं नियंत्रण करत असतं. त्या चाकावर गाडी चालत असते. त्या चालवणाऱ्याला सगळे नियम सांगणं महत्त्वाचं,' असंही उद्धव ठाकरे म्हणाले आहेत.

# जरा अतिउत्साही कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना आवर घाला, शिवेंद्रराजे संतापले



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची छत्रपती शिवाजी महाराजांशी तुलना केल्याने आमदार शिवेंद्रराजे भोसले यांनी टीका करत पक्षातील अतिउत्साही कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना आवर घालण्याची विनंती आपण करणार असल्याचं म्हटलं आहे. तसंच नरेंद्र मोदींना मराठी माणसांच्या भावना माहित असल्याने हे करायला त्यांनी सांगितलं असेल, असं मला वाटत नाही असंही ते म्हणाले आहेत. नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान असल्याने ते आपली तुलना महाराजांसोबत करणार नाहीत. त्यांचा नक्कीच या प्रकरणाशी संबंध नसेल अशी खात्री शिवेंद्रराजे यांनी व्यक्त केली.**

'छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज किंवा नंतरच्या काळातील स्वातंत्र्य सेनानी यापैकी कोणाचीही तुलना कोणासोबत होऊ शकत नाही', असेदेखील शिवेंद्रराजे म्हणाले. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एक वेगळी प्रतिमा आहे. त्यांनी स्वत: ती निर्माण केली आहे. नरेंद्र मोदी यांनी जगासमोर भारताची एक वेगळी प्रतिमा उभी करुन दाखवली आहे. त्यांनी देशवासियांचा विश्वास संपादीत केला आहे,' अशी स्तुती यावेळी त्यांनी केली.

'पण पक्षात काही अतिउत्साही कार्यकर्ते, पदाधिकारी असतात. त्यांच्या माध्यमातून असे काही प्रकार होतात. आणि विरोधकांना पक्षनेतृत्त्वार टीका करण्यास, चिखलफेक करण्यास संधी मिळते. अशा पदाधिकाऱ्यांना आवर घातला पाहिजे. त्यांना योग्य ती समज दिली पाहिजे अशी विनंती मी पक्षश्रेष्ठींकडे करणार आहे,' असं शिवेंद्रराजे यांनी म्हटलं आहे.




# अपघात व अपघाती मृत्यु च्या संख्येत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशनाद्वारे झालेली घट याची वाहतुकनियमन जनजागृती व राज्यस्तरीय समिती अहवालामध्ये ठाणे ग्रामीण पोलिसांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव सोहळा





नरीमन पॉईट येथे पार पडलेल्या वाहतुकी विषयक कार्यक्रमात वाहतुक शाखा ठाणे ग्रामीण कडून वाहतूक नियमन जनजागृती व त्यामुळे अपघात आणि अपघाती मृत्युच्या संख्येत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे झालेली घट याची राज्यस्तरीय समितीने आढावा घेऊन महाराष्ट्र राज्यात ४ जिल्हयांची निवड केली. यामध्ये ठाणे ग्रामीणचे अधिक्षकशिवाजीराव राठोड व अपर पोलिस अधिक्षकश्री. संजय पाटील यांच्या मार्गशनामुळे वाहतूकनिरीक्षकठाणे ग्रामीणचे अनिल पवार व त्यांचे सहकारी यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# जिद्दी मराठा समोर नमले प्रशासन

## आंदोलनानंतर मैदानाबाहेर पालिकेने लावला फलक



भाईंदर : महापालिकेच्या खेळाच्या मैदानाबाहेर फलक लावण्याची कार्य वाही केली असून अन्य आरक्षणे ताब्यात घेण्यासाठी समिती नेमणे व आरजी जागेतील अतिक्रमणांवर कारवाई करणे अशी आश्वासने मिळाल्याने याबाबत सुरु असलेले जिद्दी मराठा संस्थानी शुक्रवारी उपोषण मागे घेतले.

मिरा भाईंदर मधील अनेक आरक्षित जागा धन दांडग्या बिल्डरांकडे तसेच लोक

उर्वरित पृष्ठ 4 वर

# आग्री कोळी मालवणी महोत्सव २०२०

## मिरा-भाईंदरमध्ये धुमधडाक्यात साजरा



मिरा भाईंदरमध्ये शिवसेना नगरसेवक हरिश्चंद्र आमगांवकर मागील १७ वर्षांपासून मिरा भाईंदर मध्ये हा उत्सव साजरा करतात. हिंदुहदय सम्राट बाळासाहेब ठाकरे मैदानात अती भव्य स्वरुपात हा महोत्सव साजरा करण्यात येतो. मिरा भाईंदर हे इतर कोणत्याही समाजाचे नसून येथे ही जमीन

उर्वरित पृष्ठ 4 वर

# दोन पोलीस निरीक्षकांचे निलंबन

## 'मॅट'ने बेकायदा ठरविले

**यवतमाळ - महानिरीक्षकांना निलंबनाचे अधिकारच नसल्याचे स्पष्ट करत मुंबई 'मॅट'ने ६ जानेवारी रोजी विशेष निरीक्षकांचे केलेले निलंबन बेकायदा ठरवित रद्द केले.**

पोलीस निरीक्षक सुरेश सपकाळे (देवाळा) व राजेश शिरसाट (आर्थिक गुन्हे शाखा) जि. नाशिक अशी त्यांची नावे आहेत. सपकाळे यांना १७ नोव्हेंबर २०१८ तर शिरसाट यांना २१ फेब्रुवारी २०१९ला निलंबित करण्यात आले होते. लाचलुचपत विभागाचा ट्रॅप झाल्याने या अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली होती. त्यांना नाशिकच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांनी निलंबित केले. या निलंबन आदेशाची प्रत पोलीस महासंचालकांना पाठविली गेली. निलंबनाहून ९० दिवस लोटले तरी त्याचा आढावा घेतला नाही. म्हणून दोन्ही निरीक्षकांनी अ‍ॅड. भूषण बांदिवडेकर यांच्यामार्फत मुंबई 'मॅट'मध्ये धाव घेतली. तेथे न्यायिक सदस्य ए.पी. कुऱ्हेकर यांच्यापुढे हे प्रकरण चालले.

अपॉईटींग ऑथेरिटी पोलीस महासंचालक असल्याने महानिरीक्षकांना निलंबनाचे अधिकार नाही, हे अधिकार वापरायचे असेल तर तेवढी इमर्जन्सी हवी, त्याच दिवशी तातडीने महासंचालकांना स्वतंत्र अहवाल पाठविणे गरजेचे आहे. मात्र या प्रकरणात ही प्रक्रिया राबविली गेली नाही.

### दोन आठवड्यात पुनर्स्थापना

अखेर हा युक्तिवाद उचलून धरत न्या. कुऱ्हेकर यांनी महानिरीक्षकांना पोलीस निरीक्षकांच्या निलंबनाचे अधिकार नसल्याचे स्पष्ट केले. निलंबित करताना कायद्यातील तरतुदी पायदळी तुडविल्या. त्यांची खातेनिहाय चौकशीही सुरु केली नाही असे 'मॅट'ने नमुद केले. या निरीक्षकांचे निलंबन आदेश रद्द करण्यात आले. त्यांना दोन आठवड्यात पनर्स्थापना देण्याचे निर्देशित केले गेले. त्यांना सुटेबल पोस्टिंग द्या, अशा सूचना देण्यात आल्या.




मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने मिरा भाईंदर पूर्वेकडील कै.अरविंद पेंडसे उद्याना जवळ लावलेल्या फलकावर 'स्वच्छ सुंदर हरित शहर मिरा भाईंदर' असे लिहिले आहे. परंतु हा फलकच अस्वच्छ दिसत आहे .अनेक ठिकाणी ना फेरीवाला क्षेत्र, किंवा रस्त्याचे नाम फलक लावले आहेत. असे अस्वच्छ दिसणारे फलक मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने स्वच्छ करावेत, किंवा नवे फलक लावण्यात आले तर उत्तमच होईल आणि स्वच्छ सुंदर हरित शहर मिरा भाईंदरच्या सौंदर्यीकरणात मोलाची भर पडेल.

लक्ष्मण राजे

# आश्रय सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट तर्फे मिरा-भाईंदर येथे मोफत शरीर तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर संपन्न





आश्रय ट्रस्ट व जय भोलेनाथ चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विदयमाने मिरा भाईंदर वासीयांसाठी मोफत शरीत तपासणी व मोफत शस्त्रक्रिया आयोजित करण्यांत आली होती. या शिबिरामधे मेंदूचे विकार, हदयविकार, मधुमेह, हाडांचे विकार, अस्थमा, नेत्र तपासणी व चष्मा वाटप असे अनेक प्रकारचे शिबिर आयोजित करण्यांत आले. या शिबिरामधे विनायक हॉस्पिटल वसई,कृष्णा डायलेसीस सेटंर, सिपलो, असे अनेक हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत हे शिबिर संपन्न झाले.यामधे चष्माचे वाटप संस्कार सेवा संस्थाच्या संस्थापक पिंकी पाटील यांच्या वतीने करण्यात आले.आश्रय ट्रस्ट चे संस्थापक श्री.दिपक मोरेश्वर नाईक यांच्यावतीने अनेक मोतिबिंदू शस्त्रक्रिया व इतर शस्त्रक्रिया मोफत करुन देण्यांत येणार आहे. तसेच यावेळी कानाच्या मशीनही वाटण्यात आल्या. यावेळी शिबिराचे उद्घाटन मिरा भाईंदर

उर्वरित पृष्ठ 4 वर

# वाडिया रुग्णालय बंद होण्याच्या मार्गावर; निधीअभावी शस्त्रक्रिया रद्द, ३०० रुग्णांना डिस्चार्ज

**मुंबईः राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेकडून येणारा निधी थकल्यानं वाडिया रुग्णालय व्हेंटिलेटरवर आहे. औषधांचा साठा संपल्यानं रुग्णालय प्रशासनानं नव्या रुग्णांचं ॲडमिशन थांबवलं असून ३०० हून अधिक रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. निधी अभावी रुग्णसेवेवर परिणाम झाला असून शस्त्रक्रियांपासून बाह्यरुग्णापर्यंत सर्व विभाग हळूहळू बंद करण्याची प्रक्रिया प्रशासनानं सुरू केली आहे. पालिका, राज्य सरकार आणि रुग्णालय प्रशासनाच्या वादाचा फटका रुग्णांना बसत आहे.**

वाडिया रुग्णालयाचा २०० कोटींपेक्षा अधिक निधी राज्य सरकार आणि महापालिकेकडे रखडला आहे. गेल्या काही दिवसांत पालिकेनं रुग्णालय प्रशासनाला १३ कोटी निधी दिले. मात्र या तुटपुंज्या निधीत रुग्णालय चालवणं अवघड असल्याचं प्रशासनाचं म्हणणं आहे. त्यामुळे अनेक विभागांमधल्या रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. याशिवाय शस्त्रक्रियादेखील रद्द केल्या आहेत. यामुळे रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांचे हाल होत आहेत.

वाडिया रुग्णालयात ३५ पेक्षा अधिक सुपरस्पेशॅलिटी सेवा दिल्या जातात. या रुग्णालयातल्या तज्ज्ञ आणि अनुभवी डॉक्टरांनी अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अतिशय यशस्वीपणे केल्या आहेत. त्यामुळे राज्यासोबतच देशाच्या कानाकोपऱ्यातले रुग्ण वाडियामध्ये उपचारांसाठी येतात. मात्र सध्या निधी अभावी वाडिया रुग्णालय अडचणीत सापडलं आहे. पालिका आणि राज्य सरकारकडून निधी मिळत नाही, तोपर्यंत सेवा पुरवणं कठीण असल्याचं रुग्णालच्या अधिष्ठाता शंकुलता प्रभू यांनी सांगितलं. दोनशे कोटींचा निधी संपल्यानं रुग्णालयाकडे औषधसाठा आणि इतर अत्यावश्यक गोष्टी नसल्याचं त्या म्हणाल्या.

पालिका आणि राज्य सरकारकडून निधी मिळत नसल्यानं वाडिया रुग्णालय बंद होण्याच्या मार्गावर आहे. यामुळे संतप्त झालेल्या रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी सोमवारी रुग्णालयाच्या आवारात धरणं आंदोलन करण्याचा निणर्य घेतला आहे. वाडिया रुग्णालयाचा अडकलेल्या निधीपैकी ५० टक्के निधी पालिका येत्या दोन-तीन दिवसांत देईल, अशी माहिती महापौर किशोरी पेडणेकर यांनी दिली.



# बेरोजगारीमुळं दर २ तासांत तिघांच्या आत्महत्या

**मुंबई-** कांदिवली -चारकोप परिसरातील एका ४० वर्षीय महिलेनं गेल्या आठवड्यात बेरोजगारीमुळं नैराश्य आल्यानं इमारतीवरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली होती. बेरोजगारीमुळं नैराश्य येऊन आत्महत्या करणारी ही पहिली महिला नाही. २०१८ मध्ये देशभरातील १२९३६ जणांनी बेरोजगारीला कंटाळून आपलं आयुष्य संपवल्याचं खळबळजनक वास्तव समोर आलं आहे.

२०१८मध्ये रोज सरासरी ३५ जणांनी आत्महत्या केली आहे. म्हणजेच दर दोन तासांत तीन जणांनी नोकरी न मिळाल्यानं नैराश्य येऊन आत्महत्या केली आहे. २०१७ मध्ये सरासरी ३४ आणि २०१६ मध्ये सरासरी ३० जणांनी आत्महत्या केली होती. एनसीआरबीच्या आकडेवारीतून ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. या आकडेवारीवरून लक्षात येतंय की, शेतकऱ्यांपेक्षा बेरोजगार मोठ्या संख्येनं आत्महत्या करत आहेत. २०१८ मध्ये देशभरात आत्महत्यांच्या घटनांमध्ये ३.६ टक्क्यांची वाढ झाली आहे. तर २०१८मध्ये आत्महत्यांच्या १, ३४, ५१६ घटनांची नोंद झाली होती. तर २०१७मध्ये १, २९, ८८७ जणांनी आत्महत्या केली होती. २०१८मध्ये १२९३६ जणांनी बेरोजगारीला कंटाळून आत्महत्या केली होती. याच कालावधीत १०, ३४९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली होती.

२०१७ मध्ये १२२४१ लोकांनी बेरोजगारीमुळं आत्महत्या केली होती. तर याच कालावधीत १०६५५ शेतकऱ्यांनी आपलं आयुष्य संपवलं होतं. तर २०१६मध्ये ११३७९ शेतकऱ्यांनी आणि शेतमजुरांनी आत्महत्या



केली होती. तर याच कालावधीत १११७३ बेरोजगारांनी आत्महत्या केली होती. बेरोजगारीमुळं २०१५मध्ये १०९१२ जणांनी जीवनयात्रा संपवली होती. तर त्याच वर्षी १२६०२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली होती.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीनुसार, देशभरातील गुन्ह्यांत मुंबई चौथ्या स्थानावर आहे. २०१८ मध्ये मुंबईत सर्वप्रकारचे ५७ हजार ७३ गुन्हे दाखल झाले असून, २०१७ च्या तुलनेत गुन्ह्यांमध्ये घट झाली आहे. गुन्ह्यांमध्ये घसरण झाल्यामुळं मुंबई तिसऱ्या स्थानावरून चौथ्या स्थानावर पोहोचली आहे.

# आरे वसाहतीत उभारणार भव्य मत्स्यालय

**मुंबई-** आरे वसाहतीतील सुमारे ११४ एकर भूखंडावर पर्यटनाच्या दृष्टीने विविध प्रकारच्या आकर्षक योजना राबविण्याचा विचार करणाऱ्या राज्य शासनाने याच परिसरात सुमारे पाच एकर भूखंडावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभे करण्याचे ठरविले आहे. हे मस्त्यालय जगभरातील पर्यटकांसाठी आकर्षण ठरेल, अशा रीतीने उभारण्यात येणार असून त्याची संपूर्ण जबाबदारी पर्यटन महामंडळावरच सोपविण्यात येणार आहे. याबाबतची प्राथमिक योजना तयार करण्यात आली असून त्यासाठी ५०० ते ८०० कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

राज्यात सत्ताबदल झाल्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबई हे आंतरराष्ट्रीय पातळीवर आकर्षण ठरावे, या दिशेने प्रयत्न करण्याचे आदेश पर्यटन विभागासोबत झालेल्या पहिल्याच बैठकीत दिले होते. त्यानुसार पर्यटन विभागाने विविध योजना राबविण्याचे ठरविले



आहे. राज्याचे मुख्य सचिव अजोय मेहता यांच्यासमोर पर्यटन विभागाने काही योजनांचे सादरीकरणही केले. त्यानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावरील मत्स्यालय हा त्याचाच भाग असल्याचे पर्यटन विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. बँकॉक, जॉर्जिया, दुबई, चीन, दक्षिण कोरिया, दक्षिण आफ्रिका, स्पेन आदी ठिकाणी असलेल्या मस्त्यालयांचा अभ्यास केल्यानंतर प्रामुख्याने बँकॉकमध्ये असलेल्या 'ओशन वर्ल्ड'च्या धर्तीवर मत्स्यालय उभारण्याचे निश्चित करण्यात आले आहे. फक्त मत्स्यालयच नव्हे तर व्यापारी संकुलासोबत काही आकर्षक धाडसी क्रीडा प्रकारही या ठिकाणी सुरू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे, अशी माहिती पर्यटन विभागाच्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने दिली. मुंबईत सध्या तारापोरवाला मत्स्यालय आहे. एकेकाळी आकर्षण असलेले हे मत्स्यालय मरणासन्न अवस्थेत आहे. या मत्स्यालयाचा कायापालट करण्याबरोबर समोरच असलेल्या अथांग समुद्राच्या पार्श्वभूमीवर भूमिगत मत्स्यालय उभारणे हे खर्चीक आहे. त्यापेक्षा अन्य ठिकाणी नवे मत्स्यालय उभारण्यावर भर देण्यात येणार आहे. सध्या आरे वसाहतीत असलेल्या नैसर्गिक वनसंपत्तीचा यथायोग्य वापर करून पक्षी उद्यान तसेच पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याचाही विचार केला जात आहे.

# बनावट विदेशी दारूसाठ्यासह मुंबईत तिघांना अटक

**मुंबई :** राज्य उत्पादन शुल्क विभागाने सांताक्रुझ येथे केलेल्या कारवाईत बनावट विदेशी दारू तयार करून विक्री करणाऱ्या तीन



आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून ४ लाख ९ हजार २४० रुपये किमतीची बनावट स्कॉचसह (उच्च प्रतिचे विदेशी मद्य) बनावटीचे साहित्य जप्त केले आहे.

नर्शी परबत बाभणिया (वय ३४), झाकीर मोहमद (वय ३२) व अरविंद बालमुकूंद शुक्ला (वय ३३) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. राज्य उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या माहितीनुसार, सांताक्रुझ येथील राज कमल सोसायटीत विदशी बनावट स्कॉचची विक्री करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार या ठिकाणी सापळा रचून आरोपींना घरातून ताब्यात घेतले. यावेळी आरोपींकडून बनावट विदेशी मद्यासह एक रिक्षा, झाकणे, कार्टन्स बॉक्स, डायमशिन व विविध प्रकारचे विदेशी मद्याचे लेबल इत्यादी साहित्य जप्त करण्यात आले. आरोपींवर महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (अ,ब,ड, ई), ८३, ९८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त प्राजक्ता लवंगारे-वर्मा, मुंबई संचालक उषा वर्मा, विभागीय उपायुक्त सुनील चव्हाण, अधीक्षक स्नेहलता श्रीकर यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

# मुंबईत १५ हजार अधिकृत फेरीवाले

**मुंबई-** सुमारे एक लाख अर्जदार फेरीवाल्यांपैकी केवळ १५ हजार १२० फेरीवाल्यांना मुंबई महापालिकेने अधिकृत ठरविल्याने अन्य फेरीवाल्यांकडून विरोध होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने अधिवासाच्या प्रमाणपत्रासह कागदपत्रे मागवली होती. त्यानंतर शहर फेरीवाला समितीद्वारे अर्जाची छाननी करण्यात आली. ही छाननी पूर्ण झाली असून केवळ १५,१२० फेरीवाले पात्र



ठरले आहेत. पात्र फेरीवाल्यांना लवकरच परवाने आणि फेरीवाल्याचे प्रमाणपत्र दिले जाणार असून त्यांना निश्चित जागाही दिल्या जाणार असल्याची माहिती परवाना विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

२४ वॉर्डात ज्या ठिकाणी फेरीवाल्यांना बसवता येईल अशा फेरीवाला क्षेत्राची यादीही जाहीर करण्यात आली होती. एकूण १३६६ रस्ते फेरीवाला क्षेत्र म्हणून ठरवण्यात आले आहेत. या रस्त्यांवर फेरीवाल्यांसाठी ८५,८९१ बसण्याच्या जागा अर्थात 'पिचेस' आखण्यात आले होते.

या फेरीवाल्यांची माहिती संकलित करण्याचे काम सध्या पालिकेतर्फे सुरू असून लवकरच त्यांना त्यांच्या हक्काच्या जागा मिळेल. मुंबईभर पालिकेने ८५ हजार जागा निश्चित केल्या आहेत. फेब्रुवारीत या जागांचे वाटप होण्याची शक्यता आहे. मुंबईत फेरीवाला धोरण राबवण्याची प्रक्रीया पालिका प्रशासनातर्फे पाच वर्षापूर्वी सुरू केली.२०१४ मध्ये पालिकेने फेरीवाल्यांचे सर्वेक्षण केले. सव्वा लाख अर्ज वितरीत करण्यात आले. एकूण ९९,४३५ फेरीवाल्यांनी अर्ज भरले. या फेरीवाल्यांकडून

# मुंबई विमानतळाचा देशांतर्गत, आंतरराष्ट्रीय प्रवाशांत घट

**मुंबई-** २०१८च्या तुलनेत २०१९ या वर्षांत जानेवारी ते नोव्हेंबर या अकरा महिन्यांच्या कालावधीत मुंबई विमानतळावरील देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रवाशांच्या संख्येत घट झाली आहे. देशाच्या हवाई प्रवाशांच्या संख्येत वाढ होत असताना, देशातील दुसऱ्या क्रमांकाच्या व्यस्त विमानतळावरील प्रवाशांच्या संख्येत घट झाली आहे. २०१९ मध्ये मुंबई विमानतळावरून ३.३८ कोटी प्रवाशांनी देशांतर्गत प्रवास केला. २०१८ मध्ये हे प्रमाण ३.५ कोटी होते. गतवर्षीच्या तुलनेत यात ३.४ टक्क्यांनी घट झाली आहे. मुंबई विमानतळावरून २०१९ मध्ये आंतरराष्ट्रीय प्रवास करणाड्रया प्रवाशांची संख्या १.३ कोटी होती. २०१८ मध्ये हे प्रमाण १.४ कोटी होते. यात ७ टक्के घट झाली आहे.

देशभरात १३.१ कोटी देशांतर्गत प्रवाशांनी प्रवास केला, तर २०१८ मध्ये ही संख्या १२.६ कोटी होती. यामध्ये ४ टक्क्यांची वाढ झाली आहे. भारतातील हवाई वाहतूक क्षेत्रात सातत्याने होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर प्रवासी संख्या घटल्याचे समोर आले आहे. गो एअर व इंडिगोच्या ताफ्यातील प्रॅट अँड व्हिटनी प्रकारच्या इंजिनामधील तांत्रिक बिघाडामुळे अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली होती. काही विमानांना बदल करेपर्यंत उड्डाणांपासून रोखण्यात आले होते. एप्रिल, २०१९ मध्ये जेट एअरवेज बंद पडल्याने, त्याचा मोठा फटका देशातील हवाई वाहतुकीला बसला आहे. त्याशिवाय भारत व पाकिस्तानमधील तणावामुळे पाकिस्तानी हवाई हद्द भारतीय विमानांना वापरण्यास १३८ दिवस बंद करण्यात आल्याने मुंबईमधून उड्डाण होणारी काही विमाने रद्द करण्यात आली होती.



# अमली पदार्थ तस्करीचे 'ठाणे'?

## गेल्या दोन वर्षात साडेतीन कोटी रुपयांचे अमली पदार्थ पोलिसांनी केले जप्त

**ठाणे :** नागरीकरणामुळे विस्तारत चाललेल्या ठाणे ते बदलापूरपर्यंतच्या शहरांत अमली पदार्थ तस्करीचे जाळेही विस्तारत चालले आहे. या शहरांतील तरुणाईला लक्ष्य करून त्यांना अमली पदार्थाच्या व्यसनाच्या जाळय़ात ओढण्याचे प्रकार सातत्याने सुरू असून पोलिसांच्या कारवाईनंतरही यावर नियंत्रण आलेले नाही. विशेष म्हणजे, गेल्या दोन वर्षांत पोलिसांनी जवळपास साडेतीन कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करून २६० जणांना अटकही केली आहे. मात्र, तरीही शहरांत अमली पदार्थ विक्रेत्यांचा अंमल कायम आहे.

ठाणे, भिवंडी, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर ही शहरे ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात येतात. या शहरांमध्ये अमली पदार्थाच्या सेवनात सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र असून गेल्या दोन वर्षांत ठाणे शहर पोलिसांनी सुमारे साडेतीन कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. बाजारात अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांमध्ये गांजा आणि चरसची झिंग अद्यापही कायम असल्याचे पोलिसांच्या कारवाईतून दिसून येत आहे. ठाणे पोलिसांनी गेल्या वर्षी केलेल्या कारवाईत अमली पदार्थ बाळगणाऱ्या २६० जणांना अटक केली. त्यापैकी १७८ जणांना अमली पदार्थ सेवनप्रकरणी अटक करण्यात आली आहे. त्याआधीच्या वर्षी, २०१८ मध्येही पोलिसांची कारवाई सुरूच होती. खबऱ्यांकडून मिळणारी माहिती, समाजमाध्यमे



येथून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे पोलिसांची कारवाई सुरूच असते. मात्र, तरीही अमली पदार्थ विक्रीचे जाळे पसरत चालल्याचे चित्र आहे.

इतर अमली पदार्थाची विक्री चरस, गांजा यासह एमडी, हेरॉईन, केटामाईन, अफू आणि सिरपचे सेवनही मोठ्या प्रमाणात आढळत आहे. २०१९ मध्ये पोलिसांनी १४ लाख ४१ हजार १३० रुपयांचे एमडी जप्त केले, तर ३ लाख ३३ हजार १५० रुपयांचे हेरॉईन जप्त केले. २०१८ मध्ये पोलिसांनी ३४ लाख २५ हजार ९०० रुपयांचे एमडी आणि ६ लाख २० हजार रुपयांचे इफ्रेडीन जप्त केले आहे.

# नागरिकांचे स्वातंत्र्य काढून घेण्याचा अधिकार पोलिसांना असू शकत नाही

**मुंबई-** दोघांना बेकायदेशीररीत्या ताब्यात घेतल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पोलीस निरीक्षकाला दोघांनाही प्रत्येकी एक लाख रुपये असा एकूण दोन लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला. राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ अंतर्गत नागरिकांना दिलेले स्वातंत्र्य काढून घेण्याचा अधिकार पोलिसांच्या इच्छेवर अवलंबून असू शकत नाही. तशी परवानगी दिल्यास पोलीस अधिकाऱ्यांना मनमानी व बेलगाम अधिकार दिल्याप्रमाणे असेल, असे निरीक्षण न्या. झेड.ए. हक व न्या. एम.जी. गिरटकर यांनी पोलीस निरीक्षकाला नुकसानभरपाईचा आदेश देताना नोंदविले. वर्धा येथे राहणारे किशोर फुटाणे व त्यांचा २६ वर्षीय मुलगा यांनी त्यांना पोलिसांनी केलेली अटक बेकायदेशीर ठरवावी व पुढील कार्यवाही रद्द करावी, अशी मागणी करणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली. तसेच या प्रकरणात सहभागी असलेल्या पोलिसांची चौकशी करण्यात यावी व पाच लाख रुपये नुकसानभरपाई म्हणून द्यावेत, अशीही विनंती त्यांनी न्यायालयाला केली.

२०१३-१४ मध्ये श्री मीरन्नाथ महाराज देवस्थानच्या विश्वस्तांवरून वाद सुरू होता. याचिकाकर्ते किशोर फुटाणे हे त्या ट्रस्टच्या कार्यकारी समितीचे सचिव होते की नाही, या मुद्द्यावरून वाद सुरू होता. फुटाणे यांच्याविरोधात पोलिसांकडे करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, तक्रारदार याने ट्रस्टची कागदपत्रे असलेल्या कपाटाची चावी ट्रस्टच्या अध्यक्षांकडे असल्याचे फुटाणे यांना सांगितल्यावर त्यांनी



हे कपाट तोडण्याची धमकी दिली.

या प्रकरणाची चौकशी केल्यावर पोलिसांच्या लक्षात आले की, हे प्रकरण अदखलपात्र गुन्ह्याचे आहे. १९ जानेवारी २०१४ रोजी याचिकाकर्त्यांच्या विरोधात गुन्हा नोंदविला. मात्र, गुन्हा अदखलपात्र स्वरूपाचा असतानाही पोलिसांनी ५ फेब्रुवारी २०१४ रोजी सकाळी त्यांना ताब्यात घेतले व दुपारी सोडले.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, याचिकाकर्त्यांना दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले होते. त्यांनीच या दोघांची जातमुचलक्यावर सुटका करण्याचा आदेश दिला. हे दोघेही दखलपात्र गुन्हा करण्याची शक्यता होती म्हणून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून या दोघांना ताब्यात घेण्यात आले, असा युक्तिवाद पोलिसांतर्फे करण्यात आला. न्यायालयाने म्हटले की, सीआरपीसी कलम १५१ (१) अंतर्गत कारवाई केल्याबद्दल पोलिसांनी दिलेले कारण समाधानकारक नाही.

# तुमच्याविरुद्ध खोटा FIR दाखल झाला तर परिस्थिती कशी हॅन्डल कराल?

आपसातील भांडणातून खोटे एफआयआर दिल्या जाण्याच्या घटना अनेकदा कानावर येत असतात. कायदा आपल्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी आहे, परंतु याचा गैरवापर टाळणे देखील तितकेच आवश्यक आहे.

आजकाल, अशा प्रकारच्या अनेक घटना झाल्या आहेत ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेला बाधा पोहचविण्यासाठी खोटे एफआयआर दाखल केले आहेत.

जरी त्या व्यक्तीने कायद्यांतर्गत आपले निर्दोषत्व सिद्ध केले तरी समाजात त्याच्याकडे गुन्हेगाराच्या नजरेने पाहिले जाते.

तो आधीसारखा आदर मिळवू शकत नाही. आपल्याला खोटा एफआयआर टाळण्यासाठी कायद्याची काय तरतूद आहे, एफआयआर दाखल करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कोणती कारवाई केली जाऊ शकते आणि कसे करावे याची माहिती या लेखातून दिली आहे.

**एफआयआर काय आहे?**

एफआयआर हे फर्स्ट इन्फोर्मेशन रिपोर्टचे लघुरूप आहे. जेव्हा एखादा गुन्हा घडतो, तेव्हा ज्यांच्यासोबत गुन्हा घडला आहे तो पोलिसांना कळवतो याला एफआयआर म्हणतात.

जेव्हा घटनेची तोंडी सांगितलेली पहिली माहिती लिखित स्वरुपात बदलली जाते तेव्हा ती एफआयआर असते.

फौजदारी दंड प्रक्रिया कायद्याच्या कलम १५४ अंतर्गत पोलिसांना दखलपात्र गुन्हा असलेल्या प्रकरणात एफआयआर दाखल करावा लागतो.

**एखाद्याने खोटा एफआयआर दाखल केल्यास काय करावे?**

अनेक प्रकरणात असे दिसून आले आहे की, काही लोक वादविवाद झाल्यास परस्परांविरुद्ध खोटे किंवा बनावट एफआयआर दाखल करतात. ज्यांच्याविरुद्ध खोटा एफआयआर दाखल केला जातो, त्याला पोलिसांच्या आणि न्यायालयाच्या कायदेशीर प्रक्रियांमध्ये अडकवले जाते. त्यामुळे त्या व्यक्तीचा वेळ, पैसा इत्यादी विनाकारण खर्च होत असतात. परंतु खोटे एफआयआर दाखल होण्याविरूद्ध काही मार्ग आहेत होणारा त्रास टाळला जाऊ शकतो. फौजदारी दंड प्रक्रिया कायद्याच्या कलम ४८२ असा कायदा आहे ज्याचा उपयोग अशा हेतुपरस्पर घटनांपासून दूर राहण्यासाठी केला जाऊ शकतो.

**फौजदारी दंड प्रक्रिया कलम ४८२ काय आहे?**

या कलमाच्या अंतर्गत वकीलाद्वारे उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला जाऊ शकतो. यांत ज्याच्यावर एफआयआर दाखल झाला आहे ती व्यक्ती त्याच्या निर्दोषपणाचा पुरावा देऊ शकते.

## संपादकीय...

# अर्थव्यवस्थेची घसरगुंडी!


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

गत काही काळापासून आर्थिक आघाडीवर एकामागोमाग एक झटके सहन करीत असलेल्या नरेंद्र मोदी सरकारला आणखी एक तगडा झटका बसला आहे. जागतिक बँकेने बुधवारी 'जागतिक आर्थिक संभावना' या शीर्षकाचा अहवाल जारी केला. त्यामध्ये २०१९-२० या आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक विकास दर पाच टक्क्यांपर्यंत घसरण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. जागतिक बँकेने यापूर्वी भारताचीअर्थव्यवस्था २०१९-२० मध्ये सहा टक्के दराने वाढेल, असा अंदाज व्यक्त केला होता, हे येथे उल्लेखनीय आहे.

डिसेंबरच्या अखेरच्या आठवड्यात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनेही आर्थिक मंदीचा मुकाबला करण्यासाठी भारत सरकारने तातडीने पावले उचलण्याची गरज प्रतिपादित केली होती. देशातील अर्थतज्ज्ञ, राजकीय पक्ष, प्रसारमाध्यमे अर्थव्यवस्थेच्या स्थितीबाबत सरकारवर टीका करीत होते, तेव्हा सत्ताधारी पक्षाचे धुरीण त्यांच्यावर अभिनिवेशातून टीका करीत असल्याचा आरोप करीत होते. आता जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या संस्थाही भारत आर्थिक मंदीचा सामना करीत असल्याची वस्तुस्थिती मांडत आहेत.

जागतिक बँकेने अहवालात केलेल्या विश्लेषणानुसार, भारतीय नागरिकांनी खर्च कमी केले आहेत आणि सोबतच गुंतवणुकीच्या बाबतीतही हात आखडता घेतला आहे. त्यामुळे सरकारने खर्चात वाढ केल्याचा जो प्रभाव दिसायला हवा होता तो आपोआपच निष्प्रभ झाला आहे. सोप्या शब्दात सांगायचे झाल्यास, अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी सरकारतर्फे जी पावले उचलण्यात आली, ती नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करण्यात अपयशी ठरली! जोपर्यंत नागरिकांना अर्थव्यवस्थेच्या प्रकृतीबद्दल विश्वास वाटणार नाही, तोपर्यंत सरकारने कितीही उपाययोजना जाहीर केल्या आणि सरकारी खर्च कितीही वाढवला तरी अर्थव्यवस्थेला गती मिळणार नाही, असेच एकप्रकारे जागतिक बँकेच्या अहवालाने ध्वनित केले आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या वार्षिक समीक्षा अहवालातही भारतीय अर्थव्यवस्थेची गती मंदावण्यासाठी नेमक्या याच कारणांवर बोट ठेवण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीदेखील लवकरच भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासदराबाबतचा अंदाज व्यक्त करणार आहे. गत ऑक्टोबरमध्ये नाणेनिधीने विकासदराच्या अंदाजात एक टक्क्याने कपात करून तो ६.१ टक्के राहण्याचा अंदाज वर्तविला होता. आता नाणेनिधीनेही तो पाच टक्क्यांवर आणल्यास आश्चर्य वाटू नये!

विशेष म्हणजे मोदी सरकारनेही विकासदर पाच टक्क्यांपर्यंत खाली घसरण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाने काही दिवसांपूर्वीच हा अंदाज वर्तविला होता; मात्र स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अर्थतज्ज्ञांना तर पाच टक्क्यांचा अंदाजही अतिरंजित वाटत आहे. त्यांच्या मते २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थव्यवस्था कमाल ४.६ टक्के दरानेच वाढू शकते. जपानची ब्रोकरेज कंपनी नोमुरा, तसेच भारतीय ब्रोकरेज कंपनी कोटक सिक्युरिटीजनेदेखील ४.७ टक्के विकासदराचा अंदाज वर्तविला आहे, तर येस बँक या खासगी बँकेच्या अर्थतज्ज्ञांनी विकासदर ४.९ टक्के राहण्याची शक्यता वर्तविली आहे. थोडक्यात चालू वित्त वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेची गती चांगलीच मंदावण्याच्या शक्यतेबाबत आता सरकारसकट सगळ्यांचेच एकमत दिसत आहे.

या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी अर्थतज्ज्ञांसोबत चर्चाविनिमय केला. मोदी यांनी यापूर्वीही अशा प्रकारच्या तब्बल डझनभर बैठकी घेतल्या; मात्र त्यामधून काही फलनिष्पत्ती झाल्याचे अद्याप तरी दृष्टोत्पत्तीस पडलेले नाही. गंमत म्हणजे केंद्रीय अर्थसंकल्पाच्या तोंडावर पंतप्रधानांनी गुरुवारी घेतलेल्या बैठकीत केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सीतारामणच उपस्थित नव्हत्या. त्यामुळे विरोधकांच्या हाती आयताच एक मुद्दा लागला आहे.

या बैठकीत सहभागी झालेल्या तब्बल ४० अर्थतज्ज्ञांनी अर्थव्यवस्थेला संकटातून बाहेर काढण्यासाठी, कर्जवृद्धी, निर्यातवृद्धी, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे संचालन, उपभोग आणि रोजगारवृद्धी यावर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला. त्यांचा सल्ला शिरोधार्य मानून सरकार पावले उचलेल, असे आश्वासन पंतप्रधानांनी अर्थतज्ज्ञांना दिल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमात उमटल्या आहेत. पंतप्रधानांनी दिलेल्या आश्वासनाच्या पूर्ततेच्या दिशेने सरकार जेवढ्या लवकर पावले उचलेल तेवढे चांगले; अन्यथा घसरगुंडीच्या मार्गावर लागलेले अर्थव्यवस्थेचे गाडे आणखी नेमके किती घसरेल, हे सांगता येणार नाही!

# विद्यार्थी विद्रोह



प्रश्न दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात झालेल्या हल्ल्यामागे कोणाचा हात आहे, हा नाही. प्रश्न हा देखील नाही की हा हल्ला अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सदस्यांनी केला की डाव्यांच्या संघटनेने अभाविपच्या विद्यार्थ्यांवर केला. या विद्यापीठातील संघर्षांची सुरुवात नक्की कोणी केली हा देखील जे काही झाले या संदर्भात महत्त्वाचा मुद्दा नाही. तथापि जे काही झाले ते झालेच कसे आणि उच्चपदस्थांची साथ नसती तर जे काही झाले ते होऊ शकले असते का, हे दोनच प्रश्न या संदर्भात महत्त्वाचे ठरतात. या दोन प्रश्नांच्या उत्तरांत देशातील विद्यापीठांतील सध्याच्या अस्वस्थतेची मुळे दडलेली आहेत. त्यामुळे बाकीच्या मुद्दयांची फोलपटे बाजूस करून या दोन मुद्दयांच्या अनुषंगानेच जे काही सुरू आहे त्याचा अन्वयार्थ लावायला हवा. तसे करताना पहिले सत्य म्हणजे विद्यमान सत्ताधाऱ्यांच्या विचारधारेस जेएनयूची होत असलेली अडचण. हे विद्यापीठ डाव्यांचे माहेरघर मानले जाते. भाजपचे विनोद तावडे यांच्यासारख्या नेत्याची जेएनयू विद्यापीठातील कामगिरी सोडली तर अभाविप या संघटनेस या विद्यापीठात फारशी घुसखोरी करता आलेली नाही. तावडे यांनी त्या वेळी स्वत:स दिल्लीत गाडून घेतले होते आणि त्यांच्या त्या वेळच्या जेएनयू मोहिमेस यश आले होते. पण ते टिकले नाही. त्यामुळे जेएनयू पुन्हा डाव्यांच्या हाती गेले. दिल्लीत श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्स हे हिंदुत्ववादी विचारसरणी अंगीकारणाऱ्यांचे तर जेएनयू हे डाव्यांचे अशी ही विभागणी. ती राजकीय पातळीवर सर्वमान्य होती. विख्यात अर्थशास्त्री, नोबेल विजेते अभिजित बॅनर्जी ते आर्थिक विषय हाताळणीत चाचपडणाऱ्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यापर्यंत अनेक नामांकित जेएनयूच्या मांडवाखालून गेलेले तर अरुण जेटली ते काही भाजप-प्रेमी माध्यमवीर ही श्रीराम महाविद्यालयाची निर्मिती. या अशा 'विभागणी'विषयी कोणाची हरकत नव्हती. दोन्हीही गट प्रसंगी एकमेकांच्या प्रभावक्षेत्रात शिरण्याचा प्रयत्न करीत. पण ते देखील लोकशाही रीतिरिवाजानुसारच होत असे. क्वचित हे दोन गट एकमेकांना भिडत. पण त्यामागे तरुणाईचा अधिकृत राजकारणात शिरण्याआधीचा उत्साहच अधिक असे. परंतु जेएनयूत सध्या जे काही सुरू आहे त्याकडे इतक्या निरागसपणे पाहता येणार नाही. याचे कारण विद्यमान सत्ताधाऱ्यांच्या सर्व विरोध नेस्तनाबूत करण्याच्या वृत्तीत आहे किंवा काय याचा तपास घ्यायला हवा. तसे केल्यास अन्य विद्यापीठांतील घटनांचाही संदर्भ लागू शकेल. अभाविप आणि डाव्या विद्यार्थी संघटना या केरळ वा पश्चिम बंगाल या राज्यांत सातत्याने एकमेकांविरोधातील हिंसाचारास सामोरे गेल्या. पश्चिम बंगालात डावे सत्तेवर होते आणि केरळात ते आहेत. त्यामुळे या सरकारांनी नेहमीच अभाविप वा संघीय विचारधारेशी संबंधित संघटनांना सातत्याने चेपले. त्या राज्यांतील डाव्यांच्या तत्कालीन हल्ल्यांचे वर्णन नृशंस असेच करावे लागेल इतके ते भीषण होते. तेव्हा त्याचा वचपा काढायची संधी अभाविप वा त्या बाजूच्या संघटनांना भाजपच्या केंद्रातील झळाळत्या यशाने मिळाली. गेली सहा वर्षे त्यामुळे या संघटना जेएनयू सर करण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे करण्याचा सोपा मार्ग म्हणजे या डावेप्रणीत विद्यार्थी संघटनांना सतत राष्ट्रद्रोही ठरवणे. 'टुकडे टुकडे गँग' ही (दंत?)कथा जन्मास घातली गेली ती यामुळे. हिंदुत्ववादी संघटनांना अशा 'राष्ट्रद्रोही' आरोपाचा आधार घ्यावा लागतो कारण समोरासमोरील माध्यमी युक्तिवादांत डावे त्यांना सहजी धूळ चारतात. डाव्यांइतकी माध्यममत्री आणि युक्तिवाद चातुर्य उजव्यांना अजूनही जमलेले नाही. परिणामी कानकोंडे व्हावे लागलेले हे डाव्यांना राष्ट्रद्रोही ठरवतात. आणि तसेही बौद्धिक आणि सद्धांतिक युक्तिवादापेक्षा राष्ट्रप्रेम ही संकल्पना इतरांच्या गळी उतरवणे नेहमीच सोपे असते. जेएनयू संघर्षांत सध्या तेच दिसून येते. नागरिकत्व कायद्याच्या मुद्दयावरून देशभरात अपेक्षेपेक्षा जास्त पसरत चाललेली नाराजी आणि गहिऱ्या होत चाललेल्या आर्थिक संकटातून मार्ग काढण्यात येत असलेले अपयश यामुळे सरभर झालेल्या सरकारला देशभरात विद्यार्थ्यांची आंदोलने टोचू लागली असतील तर त्यात आश्चर्य नाही. विद्यार्थी आंदोलने हाताळण्यास कमालीचे राजकीय कसब लागते. आंदोलक विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करावे तर त्यांचा आवाज वाढतो, आपल्या कल्पकतेने ते अधिकाधिक लक्ष खेचून घेतात आणि माध्यम प्रसिद्धीमुळे ही आंदोलने आहेत त्यापेक्षा अधिक परिणामकारक ठरतात. पण हे नको म्हणून त्यांच्यावर कारवाई करू जावे तर 'राजा भिकारी.. माझी टोपी नेली' असे म्हणत हे विद्यार्थी अधिकच वाकुल्या दाखवू लागतात. यांना धरताही येत नाही आणि सोडताही येत नाही, अशी अवस्था. ती हाताळणे इंदिरा गांधी यांच्यासारख्या राजकीय मुत्सद्दीस देखील जमले नाही. सध्याच्या नेतृत्वास तर कोणाही विरोधकाशी चर्चा करणे हाच कमीपणाचा मुद्दा वाटतो. त्यात हे तर विद्यार्थी. म्हणजे कस्पटेच! त्यांची दखल घेण्याची गरजच काय, असे सत्ताधीशांना वाटत असल्यास ते त्यांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वांस साजेसेच म्हणायचे. अशा वेळी सरकारी यंत्रणा, म्हणजे पोलीस आदी आंदोलक विद्यार्थ्यांवर कारवाई करताना दिसल्यास त्यामुळे नेतृत्वाच्या 'दृढनिश्चयी', 'करारी' वगरे प्रतिमेस तडा जाण्याचा धोका असतो. त्यापेक्षा दोन परस्परविरोधी विद्यार्थी संघटनांतील हिंसाचार असे स्वरूप त्या संघर्षांस मिळाल्यास इतरांच्या वहाणेने विंचू मारता येतो. जेएनयूत तसे झाले आहे किंवा काय याचा तपास व्हायला हवा. पण तो करणार कोण, हा प्रश्न आहे. कारण दिल्ली हे राज्य असले तरी ते अन्यांसारखे स्वतंत्र नाही. त्या प्रदेशातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी केंद्रीय गृहमंत्रालयाची. तेव्हा या हिंसाचारामागे कोण आहेत हे खरोखरच हुडकून काढायचे असेल तर पोलिसांची निवडक अकार्यक्षमता आणि कारवाईतील दिरंगाईस विरोध या मुद्दयांना हात घालावा लागेल. दिल्लीतल्या जामिया मिलिया विद्यापीठात स्वत: घुसून गोळीबार करण्याची तत्परता दाखवणाऱ्या दिल्ली पोलिसांस जेएनयूत सुगावा लागला तरी हस्तक्षेप करावा असे वाटत नाही, हे कसे? लाठ्याकाठ्या, हातोडे वगरे जामानिमा हाती घेऊन बाहेरच्या टोळ्या विद्यापीठांत घुसतात आणि तरीही पोलीस अनभिज्ञ असतात याचा अर्थ काय? आपल्याकडच्या कुडमुडय़ा व्यवस्थेत या प्रश्नांची उत्तरे कधीही मिळणार नाहीत. पण आजचा विद्यार्थी कालच्या विद्यार्थ्यांपेक्षा जास्त सजग, डोळस आणि 'स-शस्त्र' आहे. तो वयाने कदाचित अजाण असेल. पण त्याच्या हातातील मोबाइलमुळे तो समाजमाध्यमांचा सक्रिय नागरिक आहे. हेच त्याचे 'शस्त्र'. त्याची परिणामकारकता देशभरातील विद्यापीठांत उमटलेल्या प्रतिक्रियांवरून एव्हाना दिसू लागली आहे. सोमवारी जेएनयूतील हिंसाचार शमायच्या आत मुंबईच्या 'गेटवे ऑफ इंडिया'वर शेकडो तरुण जमा झाले. त्यांची संख्या आणि तीव्रता उत्तरोत्तर वाढतच असून ती तितक्याच परिणामकारकपणे पसरतदेखील आहे. या आंदोलनात सहभागी होणारे सर्व मुसलमान नाहीत आणि डावेही नाहीत. पण त्यांना ज्या पद्धतीने हे सरकार विद्यार्थ्यांना हाताळते हे मान्य नाही. तेव्हा जोपर्यंत सरकार या मागील गुन्हेगारांना पाठीशी घालताना दिसते तो पर्यंत हे विद्यार्थी आंदोलन आवरणे अशक्य. त्यांची ताकद सरकारने दुर्लक्षू नये.

# ठाण्यात गुंगीकारक औषधांचा सुळसुळाट

## अन्न आणि औषध प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष

**ठाणे – गुंगी आणणाऱ्या औषधांच्या तस्करीवर अंकुश आणण्यात अन्न आणि औषध प्रशासनाला यश येत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. भिवंडीत पुन्हा एकदा गुंगीकारक औषधांचा साठा जप्त करण्यात आला आहे. एका युवकाला अटकही केले असून अन्य फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. या युवकाकडून २३० कफ सिरपच्या बाटल्या जप्त करण्यात आलेल्या आहेत. परंतु सर्रास गुंगीकारक औषधांची बेकायदा विक्री सुरू असून अन्न आणि औषध प्रशासनाचे काडीमात्र लक्ष नसल्याने औषध तस्करांचे फावले आहे. वेळीच तस्करांवर कारवाई करणे गरजेचे आहे.**

कफ सिरप, अल्प्रोझोलम तसेच अन्य औषधांचा वापर नशेसाठी करण्यात येत असल्याचे अनेकदा उघडकीस आले आहे. काही औषधे डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय मिळत नाहीत. तरीही ही औषधे नशेबाजांपर्यंत पोहोचतात कशी याबाबत गौडबंगाल आहे. मध्यंतरी मुंब्रा परिसरातून मोठ्या प्रमाणात 'स्टेरॉइड्स'च्या गोळ्या जप्त करण्यात आल्या होत्या. या कारवाईनंतर मुंब्र्यातच पाचवी पास असलेल्या महिलेकडे औषधांचा साठा मिळाला होता. ही महिला औषधांची विक्री करत असल्याचे त्यावेळी उघड झाले होते. ठाण्यानंतर कल्याणमध्ये बेकायदा गुंगीकारक औषधांचा साठा जवळ बाळगल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध कारवाई झाली आहे. विशेष म्हणजे अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) औषधांचा बाहेर कोणी गैरवापर करत नाही ना? याकडे बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. मात्र या विभागाकडून दुर्लक्ष केले जात आहे. एफडीएमध्ये कर्मचारी कमी असल्याने कारवाईला मर्यादा येत असल्याचे सांगितले जात आहे. शिवाय एफडीएच्या अधिकाऱ्यांचे नेटवर्कही तितके सक्षम नसल्याने औषधांच्या तस्करीची माहिती अधिकाऱ्यांना मिळत नाही. त्यामुळे तितक्या प्रमाणात कारवाया होत नसून दुसरीकडे पोलिसांकडूनही औषध तस्करांवर कारवाई करण्यात येते. गेल्या वर्षी भिवंडी गुन्हे शाखेने कारवाई करत एका तरुणाकडून १०० गुंगीकारक औषधांच्या बाटल्या जप्त केल्या होत्या. तर, २०१८च्या सप्टेंबर महिन्यात ठाणे खंडणीविरोधी पथकाने भारतात बंदी असलेल्या 'ट्रॅमोडॉल' या गुंगीकारक औषधाची विक्री करणाऱ्या टोळीला पकडले होते.

या टोळीमध्ये इंदौर येथील फार्मास्युटिकल कंपनीच्या मालकासह बांधकाम व्यावसायिक आदींचा समावेश होता. तसेच टोळीकडे औषधांच्या ९ हजार ८०० स्ट्रिप्स मिळाल्या होत्या. आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये या औषधाची किमत कोंट्यवधी रुपये होती. गैरमार्गाने औषधांचा चाललेल्या बेकायदा धंद्यावर अंकुश येत नसून अनेक प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर मुख्य आरोपींचा शोधच लागत नाही. त्यामुळे तपास मध्येच थांबत



असल्याचे चित्र आहे. नुकतेच भिवंडीत मोटारसायकलवरून कफ सिरपच्या बाटल्या घेऊन जाणाऱ्या एका युवकाला भिवंडी गुन्हे शाखेने अटक केले आहे. त्याच्याकडून २३० बाटल्या जप्त केल्या असून युवकाकडे औषधांची खरेदी, विक्री आणि वितरणाचा कोणताही परवाना नव्हता. भिवंडी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून युवकासोबत त्याचे आणखी दोन साथीदार असल्याचे समजते. परंतु तस्करांनी मांडलेला गुंगीकारक औषधांचा बाजार उठणार कधी, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# दूषित पाणीपुरवठा करणाऱ्या ५१ व्यावसायिकांवर गुन्हे

**विरार :** वसई-विरारमध्ये बाटलीबंद पाण्याचा गोरखधंदा राजरोसपणे सुरू असल्याने महापालिका प्रशासनाने यावर कारवाईची कुऱ्हाड उगारली आहे. नालासोपारा पूर्वेत पाणीविक्रेत्यांकडून दूषित पाणीपुरवठा केला जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर महापालिकेने कारवाई करत ५१ व्यावसायिकांवर तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस निरीक्षक डी. एस. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार नालासोपाऱ्यातील नगीनदास पाडा, प्रगती नगर, रेहमत नगर परिसरात दूषित पाणीपुरवठा केला जात होता. काही पाणीविक्रेत्यांकडून हा प्रकार मे २०१९पासून सुरू होता. पाणीविक्रेते आपल्या नफ्यासाठी नागरिकांच्या जीवाशी खेळत होते. याप्रकरणी नालासोपारा पालिकेच्या निलेश जाधव यांनी तुळींज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीनुसार तुळींज पोलीस ठाण्यात दुषित पाणीपुरवठा करणाऱ्या ५१



व्यावसायिकांवर गुन्हे दाखल केले.

नालासोपाऱ्यातील ५१ पाणीविक्रेत्यांकडून दूषित पाणीपुरवठा केला जात होता. त्यामुळे या व्यावसायिकांवर तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तारापूरमधील कारखान्यात भीषण स्फोट

## ६ जण ठार, ७ जखमी, ३० किमी अंतरावर हादरे

**बोईसर :** तारापूर एमआयडीसीतील एम-२ या प्लॉटमधील तारा नायट्रेट या रासायनिक कारखान्यात शनिवारी संध्याकाळी भट्टीचा भीषण स्फोट झाला. या स्फोटात सुरक्षारक्षक अन्सारी इलियास (४०), राजमतीदेवी सुरेंदर यादव (४०), निशू राहुल सिंग (२६), माधुरी वशिष्ठ सिंग (४६), गोलू सुरेंदर यादव (१९), मोहन (४५) हे सहा जण ठार



झाले आहेत. तर २ लहान मुलींसह ७ जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये कारखान्याचे मालक नटूभाई पटेल यांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना उपचारासाठी मुंबईला नेण्यात आले. स्फोटाने कोसळलेल्या कारखान्याच्या ढिगाड्ढयाखाली काही जण अडकल्याची शक्यता आहे. स्फोटाचा हादरा सुमारे ३० किलोमीटरच्या परिसरात जाणवला.

तारापूरमधील तारा नायट्रेट या कारखान्यात संध्याकाळी सातच्या सुमारास भीषण स्फोट झाला. नंतर झालेल्या भीषण स्फोटात कारखान्याच्या इमारतीचा काही भाग कोसळला. ढिगाड्ढयाखाली अडकलेल्यांचा शोध अग्निशमन दलाचे जवान घेत आहेत.

बचावकार्यासाठी एनडीआरएफलाही पाचारण करण्यात आले आहे. सुरक्षिततेचा उपाय म्हणून पोलिसांनी त्या भागातील रस्ते बंद केले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून स्फोटानंतर संपूर्ण परिसराचा विद्युत पुरवठा बंद करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली आणि मदतकार्य सुरू केले. या स्फोटात गंभीर जखमी झालेल्यांना रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या कारखान्याच्या ठिकाणी बांधकाम सुरू असल्याने तिथे बांधकाम मजूरही होते.

या मजुरांच्या कुटुंबातील दोन लहान मुलीही स्फोटात गंभीर जखमी झाल्या आहेत. स्फोटानंतर या कंपनीतील काही अवशेष उडाल्याने बाजूच्या कारखान्यांचेही नुकसान झाल्याचे समजते. या कंपनीमध्ये नव्या उत्पादनाची ट्रायल घेण्यात येत होती. स्फोटानंतर पालघर भागातील अनेक गावांना भूकंप झाल्याचा भास झाला, मात्र काही वेळाने परिसरात स्फोट झाल्याचे समजले.

### मृतांच्या नातेवाइकांना पाच लाखांची मदत

तारापूर औद्योगिक वसाहतीतील रासायनिक कंपनीत झालेल्या स्फोटातील मृतांच्या नातेवाइकांना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींना सर्व वैद्यकीय साहाय्य पुरविण्याचे निर्देश देण्यात आले असून मुख्यमंत्री स्वत: बचावकार्यावर लक्ष ठेवून आहेत. बचावकार्यासाठी एनडीआरएफची मदत घेण्यात आली आहे.

# पोलीस अधिकारी फरार घोषित

**नवी मुंबई :** विनयभंगप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या अप्पर पोलीस आयुक्त निशिकांत मोरे यांचा जामीन अर्ज पनवेल न्यायालयाने गुरुवारी फेटाळला. त्यामुळे मोरे यांना फरार घोषित करण्यात आले आहे. त्याचा शोध पोलीस घेत आहेत. दरम्यान न्यायालय आवारात पीडित तरुणीच्या पालकांना धमकावल्याप्रकरणी दिनकर साळवी या पोलीस कर्मचाऱ्याविरोधात पनवेल पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. साळवी हा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यातील वाहनाचा चालक आहे. अप्पर आयुक्त निशिकांत मोरे यांच्याविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मोरे यांनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात अर्ज केला होता. मंगळवार, ७ जानेवारी रोजी त्यावर सुनावणी होती, मात्र त्यावर गुरुवारी सुनावणी झाली. या सुनावणीत मोरे यांचा अर्ज फेटाळण्यात आला असून त्याचा पोलीस पथक त्यांचा शोध घेत असल्याची माहिती परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त अशोक दुधे यांनी दिली. मंगळवारपासून पीडित तरुणी बेपत्ता आहे.


# यंदा मकरसंक्रांतीवर महागाईचे सावट

## सुगड, तीळगूळ महागले

मकर संक्रांत अवघ्या तीन दिवसांवर आल्याने वेगवेगळ्या आकारांची सुगडे ग्रामीण भागासह विक्रमगडच्या बाजारात दाखल झाली आहेत. संक्रांतीच्या तयारीसाठी बाजार फुलून गेला आहे. सर्वसामान्यांचा आवडता सण असलेल्या संक्रांतीच्या सणावर यंदा महागाईचे सावट पसरलेले आहे. सर्व महिला आपल्या सौभाग्याचे रक्षण आणि मनातील दुरावा दूर करण्यासाठी संक्रांतीला एकमेकांना हळदी कुंकवाचे वाण देतात, मात्र महिलांच्या या वाणांवरही महागाईचे सावट पसरले आहे.

संक्रांतीसाठी सुगड आवश्यक असतात. सुगड पुजण्याची प्रथा परंपरेनुसार आजही विक्र मगड परिसरात त्याच श्रद्धेने निभावली जात आहे. परंतु नेहमीच्या माहागाईमध्ये सुगड महाग झाली आहेत. लहान आकाराची सुगड ४० ते ५० रुपयांना पाच तर मोठ्या आकाराची सुगड ७० ते ८० रुपयांना पाच नग या भावाने विक्रमगडच्या बाजारात विकायला आली आहेत.

दिवसेंदिवस महाग होत चाललेली माती, ते बनविण्याची मजुरी, साहित्य, मेहनत, वेळ आदीचा परिणाम सुगडांवरही



झालेला दिसत आहे. संक्रांतीचे सगळ्यात मोठे आकर्षण असले तरी महिलांचे मात्र सुगडाचे वाण देण्याची प्रथाही आपल्याकडे आहे. हुरडा, बोर, गाजर, शेंगदाणे, एखादे फळ, ऊस आणि तीळगूळ सुगडात ठेवून ते महिला एकमेकींना देतात. त्यामुळे बाजारात सध्या खरेदीसाठी महिलावर्गाची लगबग सुरू आहे.

सुगड व त्यातील साहित्याप्रमणेच महिलांची गर्दी तीळ आणि गूळ खरेदीकरिता दिसून येत आहे. बाजारात गेल्या वर्षी १६० रुपये किलो तिळाची (पॉलीसचे तीळ) किंमत होती, ती यंदा १८० वर गेली आहे. तर चिकीच्या गुळाची किंमत ५५ रुपये किलो होती, यंदा मात्र या गुळाची किंमत ७० ते ८० रुपये झाल्याचे विक्रमगड येथील दुकानदार व्यापारी विकास आळशी यांनी सांगितले.

### वस्तू मिळणे अवघड

मकर संक्र ांत ही दरवर्षी १४ जानेवारीलाच येते, मात्र यंदा ती १५ जानेवारीला म्हणजेच एक दिवस पुढे हा सण गेला आहे. सध्या जानेवारीमध्येही थंडीची लाट असल्याने याचा परिणाम होऊन शेतातील गहू, हरभऱ्याची पिके अजूनही तितक्या प्रमाणात भरलेली दिसत नाहीत. एक वेळ ऊस मिळले, पण बोर, हरभड्ढयाची डहाळे कुठून आणणार, त्यामुळे संक्रांतीला या वस्तू मिळणे अवघड झाले असल्याचे काही महिलांनी सांगितले.

# मीरा–भाईंदर महापालिकेतील लाचखोर अधिकारी, कर्मचारी पुन्हा सेवेत

**भाईंदर : मीरा-भाईंदर महापालिकेमधील लाच प्रकरणात रंगेहाथ अटक करण्यात आलेले अनेक अधिकारी आणि कर्मचारी पुन्हा पालिकेत रुजू झाले आहेत. यातील अनेक अधिकारी पुर्वीच्याच पदावर कार्यरत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.**



मीरा भाईंदर महानगरपालिकेची ऑगस्ट २००२ रोजी स्थापना करण्यात आली. तेव्हापासून अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना लाच घेताना अटक करण्यात आली होती. मात्र हे अधिकारी पुन्हा पालिकेच्या सेवेत रुजू झालेले आहेत. त्यातील अनेक अधिकारी त्याच पदावर कार्यरत आहेत. या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये चंद्रकांत बोरसे, संजय दोंदे, सुनिल यादव, दिलीप जगदाळे, डॉ. रुंदन राठोड, डॉ. प्रकाश जाधव, डॉ. संजीवकुमार गायकवाड, प्रशांत जानकर या अधिकाऱ्यांसह उपशिक्षक अनिल आगळे, बालवाडी शिक्षीका अलका पाटील, लिपीक आनंद गबाळे, दशरथ हंडोरे, गणेश गोडगे, महादेव बंदिछोडे, प्रशांत कोळी, राकेश त्रिभुवन, कुंदन पाटील, योगेश शिंदे, नितीन राठोड आदींचा समावेश आहे.

अनधिकृत बांधकामांना संरक्षण, निविदा मंजुरीचे कमीशन, कामाचे देय अदा करण्याचे कमीशन, एलबीटीची माफी, विवाह नोंदणी प्रमाणपत्रसाठी लाच, नियुक्तीपत्रसाठीसाठी लाच, वाढीव वेतनश्रेणी देण्यासाठी पालिका शिक्षिकडुनच लाच, फेरीवाल्यांकडुन लाच असे लाचखोरीचे प्रकार महापालिकेत घडलेले आहेत.

लाचखोरीच्या आरोपीना पुन्हा सेवेत घेताना अकार्यकारी पदावर नेमण्यात यावे, असा नियम आहे. मात्र या लाचखोर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पुन्हा पूर्वीचीच पदे मिळाली आहेत. प्रशासनासह सत्ताधारी आणि राजकारण्यांशी लागेबांधे ही पदे मिळविली जात असल्याचा आरोप माहिती अधिकार कार्यकर्ते रोहित सुवर्णा यांनी केला आहे. चंद्रकांत बोरसे यांना प्रभाग समिती ६ मधील अनधिकृत बांधकामात लाच घेताना पकडले असताना त्यांना त्याच प्रभाग समिती वर प्रभाग अधिकारी म्हणून नेमले आहे. त्यांच्या प्रभागात अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरु असून त्याच्या अनेक तक्रारी बोरसे कारवाई करत नसल्याच्या तक्रारी आहेत .

प्रभाग अधिकारी सुनील यादव यांना अनधिकृत बांधकाम प्रकरणी लाच घेताना प्रभाग समिती १ मध्ये पकडले असताना त्यांना पुन्हा त्याच पदावर नेमले आहे . तेथे देखील मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर बांधकामांच्या तक्रारी आहेत. संजय दोंदे यांना देखील प्रभाग अधिकारी, विभाग प्रमुख आणि आता कर उपसंकलक अशी पदे दिली आहेत. दिलीप जगदाळे यांना जाहिरात विभाग दिला आहे. भाईंदर पश्चिम परिसरातील प्रभाग क्रमांक २३ मधील भाजप नगरसेविका वर्षभानूशाली यांना २०१४ रोजी ५० हजार रुपयाची लाच घेतल्याप्रकरणी झालेल्या अटकेत ठाणे न्यालयाकडून पाच वर्षांची शिक्षा व पाच लाख रुपये दंड ठोकावण्यात आला आहे.

# आश्रु ट्रस्ट सलंग्न सिनिअर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशनतर्फे ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान वाढदिवस सोहाला

अंधेरी साईवाडी येथे ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा आश्रय ट्रस्ट सलंग्न सिनिअर सिटीझ्न सोशल राईट्स फाऊंडेशन च्यावतीने साजरा करण्यात आला. मागील ८ वर्षांपासून सिनिअर सिटीझ्न सोशल राईट्स फाऊंडेशन च्या वतीने जेष्ठ नागरिकांसाठी येथे वाढदिवस व सन्मान सोहळा संस्थेचे उपसचिव श्री. संतोष चौधर हे आयोजित करतात. या कार्यक्रमामध्ये विविध क्षेत्रामध्ये प्राविण्य मिळवलेली तसेच कर्तव्य बजावलेली थोर मंडळी सहभागी होऊन आपले मार्ग दर्शन जेष्ठ नागरिकांपर्यंत पोहोचवतात. त्याचप्रमाणे पोलिस विभागातील अनेक पोलिस अधिकारी सदरच्या कार्यक्रमामध्ये भाग घेऊन अतिशय मोलाचे मार्गदर्शन करतात. यामुळे दिवसेंदिवस साईवाडी व आजुबाजुच्या परिसरातील जेष्ठ नागरिकांची संख्या या कार्यक्रमासाठी वाढत आहे. या कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ नगरिकांना विविध प्रकारच्या भेटवस्तू देण्यात येतात. यावेळी स्थानिक आमदार रमेश लटके हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. त्यांनीही त्यांच्यावतीने जेष्ठ नागरिकांना मिठाई चे वाटप केले. या कार्यक्रमाचे अंधेरी कमिटीच्या अध्यक्ष तुकाबाई चौधर यांनी आपल्या अतिशय मनमिळावू स्वभावामुळे जनसामान्यात आपला ठसा उमटवला आहे. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी हा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. या कार्यक्रमासाठी उपविभाग प्रमुख अनिल खांडेकर ,सार्वजनिकशिवजयंती उत्सव मंडळ , साईवाडीचे अध्यक्ष दिलीप परब , राष्ट्रीय उपसचिव संतोष चौधर , निवृत्त पोलीस अधिकारी पंढरीनाथ खंडागळे , संस्थेचे सल्लागार व पत्रकार अनंत दाभोळकर, हेमंत कालिया व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी ३७ जेष्ठ नागरिकांचा सत्कार पुष्पगुच्छ व केकचे पॅक्ट्स तुकाबाई चौधर , किसन शेवाळे , दिलीप प्रभु यांच्या हस्ते करण्यात आले. टासेच सर्व जेष्ठ नागरिकांना



मिठाई बॉक्सचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वासुदेव पाष्टे , उदय देशमुख , हरिश्चंद्र रेवाळे , काशिराम मांडवकर, महादेव पारदळे, राजाराम चव्हाण, शशिकांत बंड यांनी अथक परिश्रम घेतले.

# पोलीस कर्मचाऱ्यांसाठी आजारी रजा, नैमित्तिक रजा हा नेहमीच त्रासाचा विषय

**नांदेड – पोलीसांच्या वृंद परिषदेत समोर आलेल्या चर्चेतील एका मुद्यानुसार मुंबई पश्चिम प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त डॉ.मनोजकुमार शर्मा यांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार पोलीस ठाणे अधिकाऱ्याकडे पोलीस कर्मचाऱ्यांकडून मागण्यात येणाऱ्या रजेबाबत आज पर्यत देण्यात येणाऱ्या नकाराला होकार देण्याची सुचना केली आहे. मुंबई प्रादेशिक विभागात हे आदेश जारी झाले असले तरी राज्यभर सुध्दा याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.**

अपर पोलीस आयुक्त डॉ.मनोजकुमार शर्मा यांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार आगामी वृंद परिषदेत येणाऱ्या मुद्यात मुद्दा क्रमांक ५३ आहे. यात पोलीस कर्मचाऱ्यांना रजेसंदर्भाने येणाऱ्या अडचणी मांडल्या जाणार आहेत. त्या वृंद परिषदेच्या सदस्यांनी हा मुद्दा मांडतांना असे म्हटले आहे की, पोलीस अंमलदारांना रुग्णनिवेदन(सिक रजा) करतांना बऱ्याच अडचणी येतात पोलीस अंमलदार आजारी पडल्यास ज्या पोलीस वसाहतीमध्ये राहत आहेत. त्या भागातील पोलीस ठाण्यात सिकचिट्टी घेण्यास गेले असता तेथील वरिष्ठ पोलीस निरिक्षक किंवा कार्यरत दिवसपाळी, रात्रपाळी पोलीस निरिक्षक हे कार्यरत असणाऱ्या ठिकाणी जावून सिकचिट्टी घ्या अशी त्यांची बोळवन करतात. एखादा पोलीस अंमलदार आजारी झाला तर तो ज्या पोलीस ठाण्यात कार्यरत आहे त्या पोलीस ठाण्यात सिक चिट्टी घेण्यास गेला तर वरिष्ठ पोलीस निरिक्षक त्याच्याशिवाय कोणालाही सिकचिट्टी देवू नये असे तोंडी



आदेश जारी करतात. त्यामुळे खरोखरच आजारी असलेल्या पोलीस अंमलदाराला वरिष्ठ पोलीस निरिक्षक येईपर्यंत वाट पाहावी लागते. ही बाब अत्यंत गंभीर आहे.

कांही पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक नैमित्तीक रजा देतांना नाराज असतात. पोलीसांच्या कुटूंबातील लग्न समारंभ, साखरपुडा, श्राध्द आणि धार्मिक कार्य यासाठी पत्नीला पाठविण्याचा सल्ला देवून रजा नाकारतात. ही बाब सुध्दा गंभीर आहे. त्यामुळे नाईलाजाने पोलीस अंमलदार गैरहजर राहतो नाहीत रुग्णनिवेदन करतो. एकूणच रजा नाकारल्याने पोलीसाचे मानसिक संतुलन बिघडू शकते हा मुद्दा सुध्दा आगामी वृंदपरिषदेत चर्चेला येणार आहे. या संदर्भाने डॉ.मनोजकुमार शर्मा यांनी आपल्या प्रादेशिक विभागातील सर्व पोलीस उपायुक्त सहाय्यक पोलीस आयुक्त आणि वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांना पाठविलेल्या परिपत्रकात असे नमुद केले आहे की, पोलीस अंमलदार सिकचिट्टी घेण्यास आला तर त्याच्या आजार पणाचे गांभीर्य विचारात घेवून वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांची वाट न पाहता कर्तव्यावर त्यावेळी हजर असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने योग्य कार्यवाही करावी. तसेच कुटूंबातील विविध समारंभ, धार्मिक कार्य या संदर्भाने पोलीस ठाण्याकडे असलेल्या विविध बंदोबस्त, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेवून पोलीस अंमलदारांना नैमित्तिक रजा मंजूर करण्यासाठी योग्य कार्यवाही करावी. पुणे शहरातील पोलीस हवालदार अनिल बाळासाहेब गावडे हे सुध्दा वृंदपरिषदेचे सदस्य होते. पण त्यांनी कांही दिवसांपुर्वीच दोन वर्षापासून वृंदपरिषदेची बैठक झाली नाही या संदर्भाने एक पत्र दिले होते. त्यांच्या पत्राची दखल तर घेतली गेली आणि आगामी वृंदपरिषदेचे नियोजन झाले. पण अनिल गावडे यांना वृंदपरिषदेच्या सदस्य पदावरून कमी करण्यात आले आहे. यावरून पोलीस खात्यात काय चालते हे दिसते.

डॉ.मनोजकुमार शर्मा यांनी जारी केलेले परिपत्रक हे मुंबई प्रादेशिक विभागाशी संबंधीत असले तरी नांदेड जिल्ह्यासह राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या रजेची परिस्थिती परिपत्रकात उल्लेख केल्याप्रमाणेच असते म्हणून राज्यभरात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी पोलीस कर्मचाऱ्यांना रजा देतांना यासर्व बाबींचा विचार करण्याची गरज आहे. सिकचिट्टी घेण्याची गरज फक्त पोलीस कर्मचाऱ्यांनाच आहे. पोलीस अधिकाऱ्यांना मात्र कोणतीही सिकचिट्टी घ्यावी लागत नाही. त्यांनी फक्त एक नोंद केली तरी त्यांची आजारी रजा सुरू होते. मग अखेर अन्याय हा पोलीस कर्मचाऱ्यांवरच असतो. ९४ टक्के पोलीस कर्मचारी आणि ६ टक्के पोलीस अधिकारी या तुलनेत चालणारी ही राजशाही लोकशाहीच्या नावाने उल्लेखीत केली जाते.

पृष्ठ १ वरुन

# जिद्दी मराठा समोर नमले प्रशासन



प्रतिनिधीच्या ताब्यात आहेत. यातीलच एक मैदान भाईंदर पुर्वेच्या सेवन स्क्वेअर शाळेमागे महापालिकेचे २४६ क्रमांकाचे मैदानासाठी आरक्षण आहे. या आरक्षणाचे २० हजार चौ. मी. क्षेत्रफळ असले तरी महापालीका मात्र २१ हजार चौ. मी. क्षेत्रफळ ताब्यात असल्याचे सांगते. परंतू विकास आराखडयातील या आरक्षणाचा नकाश पाहिल्यास सेवन स्क्वेअर शाळेच्या मागे सेवन इलेव्हन कंपनीने आपले कुंपण घालून त्याचा खाजगी वापर चालवला असल्याच्या तक्रारी आहेत. हि जागा टी.डी.आर चा मोबदला देऊन ताब्यात घेण्यासह यात झालेले बेकायदा बांधकाम व अतिक्रमण हटवण्याची मागणी जिद्दी मराठाचे प्रदिप जंगम , आम आदमीचे ब्रिजेश शर्मा , सत्यकामचे कृष्णा गुप्ता आदींनी केली आहे. तर पालिकेकडून कारवाई सोडाच उलट नगरसेवकांनी ठरवलेल्या महासभेतील धारेणानुसार खेळाच्या मैदानाची आरक्षणाची जागाच विकासकाच्या घशात घालण्याचा घाट पालीकेने चालवला आहे.

हे आरक्षण खेळण्यासाठी खुले करावे यासह अन्य आरक्षणाच्या जमिनी ताब्यात घेणे व शहरातील वसाहतीमधील आर जी जागेतील अतिक्रमण हटवणे आदी मागण्यांसाठी उपोषणास सुरुवात करण्यात आली होती. यावेळी आयुक्त बालाजी खतगावकर, , शहर अभियंता शिवाजी बारकूंड , व कार्यकारी अभियंता दिपक खंबीत यांनी आंदोलन कर्त्यांची भेट घेतली. आरक्षणाच्या जागा ताब्यात घेण्यासाठी समीती नेमण्याचे तसेच आरजी च्या भुखंडावरील आक्रमण हटवण्याच्या कार्य वाहीचे आश्वासन देण्यात आले. तसेच आरक्षण क्रमांक२४६ येथे महापालीकेचे खेळाचे मैदान असा फलक लावण्यात आला. त्यानंतर आंदोलकांनी आपले उपोषण मागे घेतले. विशेष बाब म्हणजे महापालिकेला आपला हक्कमिळवून देण्यासाठी विविध संघटनांनी आपला मोल्यवान वेळ देऊन उपोषण , आंदोलन करणे असे कार्यक्रम राबवणे हे कितपत योग्य आहे अशी चर्चा जनसामान्यात केली जाते. महानगरपालिकेच्या कानाडोळा केल्याने परप्रांतियांचे फावते असेच पाहण्यात आले आहे.

पृष्ठ १ वरुन

# आग्री कोळी मालवणी महोत्सव २०२० मिरा-भाईंदरमध्ये धुमधडाक्यात साजरा

संपूर्ण आग्री कोळी मालवणी या समाजाची आहे. परंतू झपाटयाने वाढत चाललेल्या परप्रांतीय बिल्डरांकडून सिमेंटच्या जंगलाचे आक्रमण झाले आहे यामुळे वरील समाज कमी होत चालला आहे. परंतु शिवसेनेच्या माध्यमातून आग्री कोळी मालवणी समाजाला एकत्रित करण्याचा हा महोत्सव मागील १७ वर्षे सतत केला जात आहे. या महोत्सवाचे पूर्ण श्रेय येथील स्थानिक आमदार प्रतापजी सरनाईक यांना दिले जाते. त्यांचा या महोत्सवामध्ये खूप मोठा वाटा आहे. त्याचप्रमाणे छोटे व्यवसायिक यांना एकत्र करुन घरगुती बनविलेल्या उत्पादनाला व्यवसायात पुढाकार मिळावा यासाठी नगरसेवक हरिश्चंद्र आमगावकर यांनी खूप मोलाचे कार्य केले आहे. या महोत्सवामुळे जुने जाणते स्थानिक एकमेकांना भेटतात. छोटे व्यवसायिक या १२ दिवसाच्या महोत्सवात आपला व्यवसाय थाटतात. येथे मोठया प्रमाणात जत्रेचे स्वरुप आलेले असते. सर्व पक्षीय आमदार , खासदार , नगरसेवक या कार्यक्रमात आपली हजेरी लावतात. आयोजक हरिश्चंद्र आमगावकराच्या वतीने त्यांचा सन्मान केला जातो. अनेकप्रकारचे कार्यक्रम येथे आयोजित करण्यात येतात. यामध्ये भजन किर्तन डबलबारी लावणी आग्री कोळी नृत्य येथे सादर करण्यात येतात. संस्कृती जोपासणारा महोत्सव येथे दरवर्षी मोठया प्रमाणात साजरा केला जातो. याही वर्षी खूप मोठया प्रमाणात हा महोत्सव पार पाडला.



पृष्ठ १ वरुन

# आश्रय सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट तर्फे मिरा-भाईंदर येथे मोफत शरीर तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर संपन्न





वाहतूक विभागाचे ठाणे ग्रामीण वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री.अनिल पवार यांनी केले त्याचप्रमाणे मुंबई तरंगचे संपादक श्री.दिलीप पटेल यांनी आपला जन्मदिवस या शिबिरामधेच साजरा केला त्यांच्या सोबत शिव पांडे ही हजर होते .संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन जय भोलेनाथ चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक श्री.रवी सोडा यांनी केले होते. यावेळी त्यांचे सर्व ट्रस्टी यांनी अथक मेहनत घेऊन शिबिरांची योजना अत्यंत व्यवस्थीत पार पाडली. पोलिस पत्रकार विनोद मेढे , अनिल मेहता, संदीप लोहार, प्रविण सुर्वे यावेळी उपस्थित होते. आश्रय ट्रस्ट च्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात ठिकठिकाणी अश्या मोठया प्रमाणात मोफत शरीर तपासणी व शस्त्रक्रिया घेण्यात येतात.

# हिंदुत्व, भगवा सोडणार नाही



**औरंगाबाद-** आता तीन पक्ष एकत्र आले आहेत. खरे तर तसे होणार नव्हतेच. परंतु, आपल्याच मित्राने घात केल्याने हा निर्णय घ्यावा लागला. काँग्रेस व राष्ट्रवादीसोबत जावे का हा मोठा प्रश्न होता. एका बाजूला साखरेला लावलेले विष आणि दुसऱ्या बाजूला नुसतेच विष ठेवलेले असेल तर काय करणार? भगवान शंकराने देखील हलाहल पचवलेच होते. आम्हीसुद्धा मर्द आहोत. आम्ही ते पचवू. याचा अर्थ आम्ही हिंदुत्व सोडले असा होत नाही. हिंदुत्व सोडणार नाही, हातातला भगवा सोडणार नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी भाजपला टोला हाणला. ठाकरे यांच्या दोन दिवसीय मराठवाडा दौऱ्याचा समारोप पक्ष पदाधिकाऱ्यांच्या बैठकीने झाला. जालना रोडवरील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये त्यांनी मराठवाड्यातील जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख तसेच लोकप्रतिनिधींशी संवाद साधला. भाजपचे नाव न घेता मुख्यमंत्री पुढे म्हणाले, ते जर काश्मीरमध्ये मुफ्ती महमदबरोबर जाऊ शकतात तर आम्हाला आमची मते आहेत. ते बुद्धिबळ खेळत असतील तर मीसुद्धा बुद्धिबळाच्या पटावर फुटबॉल खेळणार नाही, आम्हालाही बुद्धिबळ खेळता येते, असे ठाकरे यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र देशाला दिशा दाखवतो. शिवसेनेनेच भाजपला हिंदुत्वाची दिशा दाखवली. मात्र, त्यांनी मित्राचा घात केला. ते बुद्धिबळ खेळत असतील, तर मी बुद्धिबळाच्या पटावर फुटबॉल खेळणार नाही, असे ते म्हणाले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)